# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २४.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २३.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून ७,५६,८६५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, कलम १३५ मपोका कायद्यान्वये ०३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,६४१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०७,२३८/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २३.०७.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे जरीपटका हद्यीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, बेझनबाग इटारसी पुलाजवळील लेंडी मैदान समोर एक अल्पवयीन बालक संशयीतरित्या वावरतांना दिसून आला. पोलीसांनी त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे खिशात रोख ४६००/—रुपये मिळून आले. त्याला पळून जाण्याबाबत विचारणा केली असता, त्याने जरीपटका हद्यीत गणेश अनाज भंडार दुकानात चोरी केल्याची कबुली दिली. त्यास युनिट कार्यालय येथे आणून, पोलीस ठाणे जरीपटका येथील गुन्हे अभिलेख तपासला असता, हद्यीत अनाज दुकानमधील चोरी बाबत घरफोडीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. त्याचे ताब्यातून मिळून आलेले रोख ४६००/—रु. जप्त करण्यात आले. विधीसंघर्षीत बालक यास मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :—एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २४.०७.२०२६ चे ००.२० ते ०१.५५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, उमरेड रोड वरील त्रिमुर्ती बारजवळ एक इसम संशयास्पद उभा असून, तो पुडीतुन अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशा माहितीवरुन, घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम होंडा शाईन दुचाकी क्र. एमएच ४९ सीक्यु ८५७१ जवळ कोणाचीतरी वाट पाहतांना संशयास्पद दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव शेख ताज शेख रहमान कुरेशी वय ४४ वर्ष रा. ठाकूर प्लॉट, एकमिनार मस्जिदजवळ, सक्करदरा, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिशात एक झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर वजनी ७.५९० ग्राम तसेच, अंमली पदार्थ विक्रीचे रोख २,०५०/—रु. मिळून आले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा मित्र नामे इस्माईल वय ४५ वर्ष रा. शिवणकर नगर झोपडपट्टी, नंदनवन, नागपूर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०५०/— रु., एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन व दुचाकी गाडी असा एकुण १,४२,९५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, पोहवा. अजय यादव, पुरुषोत्तम जगनाडे, अभिषेक शनिवारे, अतुल चाटे, पोअं. गोविंद देशमुख, चापोअं. सुवासार अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**४) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २३.०७.२०२६ चे ११.१५ ते १५.१० वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्दीत प्लॉट नं. २२४३/२४९/ए, संघर्ष नगर, शाहीद मेडीकल जवळ राहणारे ईसम नामे १) मोहम्मद सरफराज अख्तर सत्तार अन्सारी वय ३९ वर्ष २) गौसिया परवीन सरफराज अन्सारी वय ३५ वर्ष यांचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्यांचे घरात एका प्लास्टीक बोरीमध्ये हिरवे पानेफुले असलेला उग्र वासाचा अंमली पदार्थ गांजा वजनी ७.०६१ किलोग्राम मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा किमती १,७६,५२५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता स्वत:चे राहते घरात साठा करुन बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),ii(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द

पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. युनुस चांद शेख, पोउपनि. सदाशिव कणसे, पोहवा. राजेश पाली, अशोक तायडे, मपोहवा. वैशाली गायधने, पोअं. राकेश तिडके, नितेश मिश्रा, साजिद खान, अमोल भेंडेकर, विनय कोचे, मपोअं. सपना राणे व बबिता नारनवरे यांनी केली.



**<u>५) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :– हद्दपार आरोपीस अटक.</u>**

दिनांक २३.०७.२०२६ चे १३.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, जबलपुर हायवे रोडवरील भारत बेंझ कंपनीचे बाजुला एक इसम संशयीतरित्या दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विजय शामराव चन्ने वय ४९ वर्ष, रा. शारदा नगर, प्लॉट नं. ३८, गोपालकृष्ण लॉनमागे, वाठोडा, नागपुर असे सांगितले. त्यास अधिक विचारपुस केली असता, त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने, ताब्यात घेऊन युनिट कार्यालय येथे आणून, त्याचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०५ यांचे हद्दपार आदेश क्र. ४८/२०२५ दिनांक ३१.१२.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाठोडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा राजुसिंग राठोड व त्यांचे पथकाने केली.

**<u>६) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :– मा. न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावलेल्या खुनाचे गुन्हयातील फरार महिला आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०६.११.२०२२ रोजी पोलीस ठाणे कळमणा येथे कलम ३०५,३०६,३७६,३४ भां.दं.वि. सहकलम ४,६ पोक्सो अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयाचें तपासाअंती एकूण ०६ आरोपीतांविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. मा. न्यायालयाने ०४ आरोपींना दोषमुक्त करुन, इतर दोन आरोपींना दोषी ठरवून आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली होती. पैकी एक आरोपी हा मध्यवर्ती कारागृह येथे

शिक्षा भोगत असून, एक महिला आरोपी नामे अश्विनी सुरज देशभ्रतार, वय ३२ वर्ष, रा. हिवरी नगर, हनुमान मंदीरजवळ, नंदनवन, नागपूर ही गुन्हा घडल्यापासून पोलीसांची नजर चुकवून नागपूर शहरातुन बाहेर राज्यात पसार होऊन, अद्यापपावेतो मिळून आली नव्हती.

गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हयांचा पाठपुरावा करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, वर नमुद पाहिजे आरोपी अश्विनी सुरज देशभ्रतार ही पोलीस ठाणे वाडी हद्यीतील लावा या ठिकाणी येणार आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीसांनी सापळा रचून, आरोपीस ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीस्तव कळमणा पोलीसांच ताब्यात दिले आहे.

वरील कामगिरी पोलीस निरीक्षक अतुल मोहनकर, पोउपनि. अमित देशमुख, पोहवा. अमोल जासुद, विनोद गायकवाड, अनुप तायवाडे, अजय पाटील, दिनेश डवरे, पोअं. विवेक भोयर, रोहीत काळे, मनिष रामटेके, मंगेश मेश्राम, चापोअं. अनिल बोटरे, मपोअं. प्रिती थोटे व दिव्या काळे यांनी केली.



**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सिताबर्डी</u> :–** पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील गणेश टेकडी मंदीराबाहेरील देवराव बरेकर यांचे फुलांचे दुकानात काम करणारा ५० वर्षीय संतोष कोकलवार नावाचा इसम हा दिनांक २०.०७.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास मॉडर्न हायस्कुलजवळील मैदानात बेशुध्द अवस्थेत मिळून आला. त्यास उपचाराकामी मेयो हॉस्पिटल वार्ड क्र. ३९ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २१.०७.२०२६ चे २०.४० वा. चे सुमारास, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. नमुद नावाचे मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. प्रविणकुमार डहाळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**